## वसई-विरार शहर महानगरपालिका
## पाणीपुरवठा विभाग

दि.१४/०७/२०२२

# प्रेसनोट

वसई विरार शहर महानगरपालिकेस सूर्या टप्पा-१ व ३ या योजनेतून २०० द.ल.ली.प्रतिदिन पाणी उपलब्ध होते. परंतु सदर योजनेतील मासवण व धुकटण येथे दि.११ जुलै, २०२२ रोजीपासून वारंवार विज पुरवठा खंडीत होत आहे. तसेच दि.१३ जुलै, २०२२ पासून आज दि.१४ जुलै, २०२२ पर्यंत सदर ठिकाणचा विजपुरवठा पूर्णपणे बंद आहे. त्यामुळे सूर्या योजनेतून वसई विरार शहरास होणारा पाणी पुरवठा २४ तासाहून अधिककाळ पूर्णपणे बंद आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमार्फत खंडीत झालेल्या वीज पुरवठ्यातील तांत्रिक बिघाडाचा शोध घेणे सुरु असून अद्याप पर्यंत बिघाडाचा (Fault) शोध लागलेला नाही. त्यामुळे पुढील अनिश्चित काळापर्यंत शहरास होणारा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे व महानगरपालिकेचे अभियंते कार्यस्थळी उपस्थित असून वीजपुरवठा सुरळीत होण्यासाठी पाठपुरावा करीत आहेत.

वीजपुरवठा सुरळीत झाल्यानंतर सूर्या योजनेतून शहरास पुढील दोन ते तीन दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. तरी नागरिकांनी उपलब्ध पाणी जपुन वापरावे व महानगरपालिकेस सहकार्य करावे.

पाणीपुरवठा विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका